आयुक्त, शहरी आरोग्य सेवा तथा
अभियान संचालक,
राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान, महाराष्ट्र
सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचे कार्यालय

दूरध्वनी – ०२२ – २२७१७५२१
E-mail - commissioner.urbanhealth@gmail.com

आरोग्य भवन, ८ वा मजला,
सेंट जॉर्ज रूग्णालय आवार, पी . डिमेलो रोड,
सीएसटी जवळ, फोर्ट, मुंबई ४०००००१

जा.क्र. रानाआअ/जाहिरात/२०२६/५८९१(अ) दि. १६ नोव्हेंबर, २०२६

सुधारित सूचना पत्र

महानगरपालिकांतील नियमित वैद्यकिय आरोग्य अधिका-यांच्या रिक्त पदावर सार्वजनिक आरोग्य विभागाच्या समकक्ष संवर्गातील आरोग्य अधिका-यांच्या प्रतिनियुक्तीसाठी मुलाखतीबाबत.

राज्यातील शहरी आरोग्य व्यवस्था बळकट करण्याच्या दृष्टीने सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत शहरी आरोग्य आयुक्तालय स्थापित करण्यास दि. ०४ नोव्हेंबर, २०२५ च्या शासन निर्णयान्वये मान्यता दिली आहे व शहरी आरोग्य आयुक्तालयाची कर्तव्ये व जबाबदा-या निश्चित करण्यात आल्या आहेत. त्यानुसार ज्या महानगरपालिकेत नियमित वैद्यकिय आरोग्य अधिका-यांची पदे रिक्त आहेत, अशा सर्व महानगरपालिकांमध्ये वैद्यकिय आरोग्य अधिका-यांची पदे सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत प्रतिनियुक्तीने भरण्यात यावीत, असे निर्देश आहेत.

०२. सार्वजनिक आरोग्य विभागातील उपसंचालक, आरोग्य सेवा व सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा (जिल्हा आरोग्य अधिकारी संवर्ग) या संवर्गातील पात्र अधिका-यांकडून महानगरपालिकांतील नियमित वैद्यकिय आरोग्य अधिका-यांच्या रिक्त पदावर प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यासाठी अर्ज मागविण्यात आले होते.

०३. अर्जदारांनी दाखल केलेले अर्ज व त्यासोबतच्या कागदपत्रांची आयुक्तालयाच्या स्तरावर गठित समितीमार्फत पडताळणी करण्यात आली आहे. त्यानुसार सदर पदासाठी अर्हता प्राप्त व पात्र आणि अनर्हता प्राप्त व अपात्र अर्जदारांचा तपशिल दि. २८ सप्टेंबर, २०२६ व दि. ३० ऑक्टोबर, २०२६ रोजी https://nhm.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आला आहे.

०४. मा. प्रधान सचिव-१, सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे दि. १६ नोव्हेंबर, २०२६ च्या बैठकीतील निर्देशानुसार आयुक्तालयाच्या स्तरावर दि. ३० ऑक्टोबर, २०२६ रोजी https://nhm.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध केलेल्या प्रपत्र-ब मध्ये नमूद अनर्हता प्राप्त व अपात्र अर्जदारांच्या यादीमध्ये समाविष्ट असलेल्या जिल्हा शल्य चिकित्सक संवर्गातील सोबतचे प्रपत्र- अ १ मध्ये नमूद अधिकारी यांना त्यांच्या मुळ कागदपत्रांची पडताळणी व मुलाखतीसाठी बुधवार, दि. १८ नोव्हेंबर, २०२६ रोजी निमंत्रित करण्यात येत आहे.

०५. **कागदपत्रे पडताळणी:-** सदर अर्हता प्राप्त व पात्र अर्जदारांनी परिच्छेद ०६ मध्ये नमूद मुळ कागदपत्रांच्या पडताळणीसाठी **मंथन सभागृह, गोकुळदास तेजपाल रूग्णालय संकुल इमारत, ८ वा मजला, नवीन मंत्रालय, मुंबई-०१ येथे बुधवार, दि. १८ नोव्हेंबर, २०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता** उपस्थित राहणे अनिवार्य आहे.

०६. मुलाखती:- सदर पदासाठी अर्हता प्राप्त व पात्र अर्जदारांच्या मुलाखती **मा. प्रधान सचिव-१, सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे दालन, गोकुळदास तेजपाल रूग्णालय संकुल इमारत, १० वा मजला, नवीन मंत्रालय, मुंबई-०१ येथे बुधवार, दि. १८ नोव्हेंबर, २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता** आयोजित केल्या आहेत. सदर अर्हता प्राप्त व पात्र अर्जदारांनी खालील नमुद मुळ कागदपत्रे व त्यांच्या २ छायांकित प्रतींसह मुलाखतीसाठी उपस्थित राहणे अनिवार्य आहे.

१. दूरदृष्टी दस्तऐवज (Vision Document)- शब्द मर्यादा ५००.
२. तीन वर्षांचा कृती आराखडा (Action Plan).
३. सदर पदाकरिता अर्जदाराच्या योग्यतेबाबतचे निवेदन- शब्द मर्यादा ५००.
४. मागील ५ वर्षांचे गोपनिय अहवाल. (सन २०२१-२२, सन २०२२-२३, सन २०२३-२४, सन २०२४-२५ व सन २०२५-२६).
५. जिल्हा शल्य चिकित्सक संवर्गात मोडत असलेबाबत शासन निर्णय.
६. वेतनश्रेणी दस्ताऐवज.

(डॉ.जगन्नाथ म. विरकर)
अतिरिक्त अभियान संचालक
राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान, महाराष्ट्र.

प्रपत्र- अ १

महानगरपालिकांतील नियमित वैद्यकिय आरोग्य अधिकारी प्रतिनियुक्ती
अर्हता प्राप्त व पात्र अर्ज (जिल्हा शल्य चिकित्सक संवर्ग)

अ. क्र.	अर्ज. क्र.	आरोग्य अधिका-याचे नांव			कार्यरत पदाचे नाव व जिल्हा	वेतनश्रेणी
१	९	वाडीकर	प्रशांत	किशनराव	वैद्यकिय अधिक्षक, ग्रामीण रूग्णालय, श्रीगोंदा, जि. अहिल्यानगर	एस-२३
२	१४	पाटील	कपिलदेव	सहदेव	उपसंचालक (STD), महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण सोसायटी (MSACS), वडाळा	एस-२३
३	२८	मनियार	मुजफ्फर अली	खमर अली	वैद्यकीय अधीक्षक वर्ग-१, ग्रामीण रुग्णालय फुलंब्री, जि. छत्रपती संभाजीनगर	एस-२३
४	६३	खंदारे	अभिजित	महादेव	वैदयकिय अधिक्षक, छत्रपती संभाजीनगर	एस-२३
५	६६	विटेकर	ज्ञानेश	देविदासराव	शल्य चिकित्सक, जिल्हा सामान्य रूग्णालय, रत्नागिरी	एस-२३
६	४६	तडस	सचिन	विठ्ठलराव	उपसंचालक, खरेदी कक्ष, आयुक्तालय	एस-२४
७	७२	गायकवाड	प्रफुल	व्यंकटराव	वैद्यकिय अधिक्षक, छत्रपती संभाजीनगर	एस -२३
८	७३	गवारे	सुदाम	झुंबर	वैद्यकिय अधिक्षक, जिल्हा स्त्री रुग्णालय, जालना	एस -२४

(डॉ.जगन्नाथ म. विरकर)
अतिरिक्त अभियान संचालक
राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान, महाराष्ट्र.